महामंडलेश्वर
## स्वामी परमानंदगिरीजी महाराजांचे
सत्संग - प्रवचन

# मायाजाळापासून मुक्ती



*(प्रथम आवृत्ती)*

- प्रकाशक -
ॐ परमानंद प्रकाशन
**महामंडलेश्वर स्वामी परमानंदगिरीजी महाराज आश्रम**
भांगसीमाता गड, परमानंदनगर, शरणापूर, औरंगाबाद (महाराष्ट्र)
दूरध्वनी :

किंमत : आठ रुपये (८/-)

## निवेदन

"मायाजाळापासून मुक्ती" हे अनुष्ठान काळामध्ये प्रथम दिवसाचे रात्रीच्या वेळेस स्वामीजींच्या मुखातून निघालेले प्रवचनरूपी, सत्संगरूपी, वचनामृत आपल्या हातात देतांना आम्हास अपार आनंद होत आहे.

मायेमुळेच म्हणजेच अज्ञानामुळे जगात अधर्म, अन्याय, हिंसा, अत्याचार, पापकर्म, दुष्कर्म होत आहे. मायेमुळेच जीव मिथ्या, असत्य इत्यादिच्या मागे रात्रंदिवस पळत आहे आणि सत्यस्वरूप भगवंताला, धर्माला, ब्रह्माला, विसरून गेला आहे. म्हणून जीव दुःखी आहे, अशांत आहे. विषयविकाराने, व्यसनाने दुःखी होत आहे.

जीवाला सद्गती म्हणजेच मोक्ष प्राप्त होण्यासाठी आत्मा-परमात्म्याचा साक्षात्कार होण्यासाठी किंवा ब्रह्म साक्षात्कार होण्यासाठी, सत्याला जाणण्यासाठी पहिले मिथ्याचा बोध होणे अत्यंत आवश्यक आहे. म्हणून **"श्री श्री १००८ महामंडलेश्वर स्वामी परमानंदगिरीजी महाराज"** जे मोह मायाजाळापासून मुक्त एक विरक्त संन्यासी आहे. त्यांच्या अनुभवयुक्त वाणीतून जो बोध निघालेला आहे. त्याचा काही

अंश संग्रह करून लिखित स्वरूपाने आपल्या हातात देतांना आम्ही धन्यतेचा अनुभव करीत आहोत.

आम्हाला आशा आहे की, हे पुस्तक नेहमी नेहमी वाचून आपण आपल्या जीवात्म्याला मायाजाळापासून मुक्त करून शाश्वत आत्मापरमात्म्याचा साक्षात्कार करून घ्याल व संसार सागरातून मुक्त व्हाल.

**- प्रकाशक**



**नको नको मना गुंतू मायाजाळी । काळ आला जवळी ग्रासावया ।।१।।**
**काळाची हे उडी पडेल बा जेंव्हा । सोडविना तेव्हां मायबाप ।।२।।**
**सोडवीना बंधू पाठीची बहीण । शेजेची कामीन दूर राहें ।।३।।**
**सोडवीना राजा देशाचा चौधरी । आणिक सोयरी भली भली ।।४।।**
**तुका म्हणे तूज सोडविना कोणी । एका चक्रपाणी वाचोनिया ।।५।।**

♦ ♦ ♦ ♦ ♦

## मनाला उपदेश

मायाजाळापासून सुटायचे असेल, जन्ममृत्यूच्या चक्रापासून वाचायचे असेल, काळ किंवा मृत्यूच्या भयापासून मुक्त व्हायचे असेल, निर्भय, आनंदमय, सुख, शांततेने जीवन जगायचे असेल तर त्यासाठी काय केले पाहिजे? अशा प्रकारच्या कित्येक प्रश्नाचे उत्तर मिळविण्यासाठी बरेचसे साधक भक्त नेहमी फिरत राहतात. बऱ्याच ठिकाणी कथा, कीर्तन, प्रवचन इत्यादी श्रवण देखील करत राहतात. काही साधक-भक्त तर श्रवण केलेले दुसऱ्याला सांगत देखील राहतात. परंतु त्यानंतर देखील त्यांच्या जीवनामध्ये जे सुख, समाधान, शांतता पाहिजे ते मिळत नाही. जीवन जेवढे महान बनवायला पाहिजे तेवढे महान बनवू शकत नाही. एवढे श्रवण करून पाठ करूनही असे का होते? याचे खरे उत्तर हे आहे की, ते आपल्या मनाला उपदेश करत नाही. आपल्या मनाला समजावीत नाही. जीवनामध्ये तोच सुख, समाधान, शांतता प्राप्त करतो जो आपल्या मनाला समजावतो आणि महान सामर्थ्यशाली देखील तोच बनतो जो आपल्या मनाला समजावतो. जे आपल्या मनाला समजावतात तेच सामर्थ्यशाली, सद्‌गुरू, जगद्‌गुरू बनतात. जे महान बनले आहे. त्यांनी

पहिले आपल्या मनाला समजावले आहे. जसे.....

समर्थ रामदास स्वामी जे पहिले नारायण नावाने ओळखले जात होते एवढे महान का झाले? तर याचे उत्तर हेच आहे की त्यांनी प्रथम आपल्या मनाला समजावले होते. मनाच्या श्लोकामध्ये ते मनाला म्हणतात...

**मना सज्जना भक्ती पंथेची जावे । तरी श्री हरी पाविजो तो स्वभावे।**
**जनी निंद्य ते सर्व सोडूनी द्यावे । जनी वंद्य ते सर्व भावे करावे ।।**

हे सज्जन मना तू भक्तीच्या मार्गाने जा, भक्तीच्या मार्गाने गेल्याने सहज श्रीहरीची म्हणजेच भगवंताची प्राप्ती होते. भक्ती मार्गाने चालण्यासाठी आणि भगवंताची प्राप्ती होण्यासाठी या जगात जे ही निंदनीय कर्म आहे त्याला सोडून दे आणि जेवढे वंदनीय कर्म असेल ते सर्व श्रद्धा भक्ती भावनेने करायला पाहिजे.

असे मनाला समजावल्या कारणाने ते रामाचे दास रामदास, जगाचे, इंद्रियांचे स्वामी आणि सर्व काही प्राप्त करण्यास समर्थ झाले.

तुकाराम महाराज जे जगद्‌गुरू तुकाराम महाराज नावाने ओळखले जातात, जे सदेह वैकुंठात गेले अशी भक्तांची मान्यता आहे. त्यांनी देखील आपल्या मनाला समजावले होते. ते आपल्या अभंगात मनाला समजावतांना म्हणतात...

**नको नको मना गुंतू मायाजाळी । काळ आला जवळी ग्रासवया ।।**

हे मनोबा !! तू मायाजाळामध्ये गुंतू नको कारण जो मायाजाळामध्ये गुंतला त्याला काळ खातो, त्याचा नाश होतो, त्याची अधोगती होते.

जसे आपण जाणतो की कीडे, मासा, हरिण, ससे, तितर आदि



पशू-पक्षी जाळयामध्ये गुंततात आणि जे जाळयामध्ये गुंतले त्यांना मांसाहारी खातात, त्यांचा नाश होतो. अशा प्रकारे जे मायाजाळामध्ये गुंततात त्यांना देखील काळ खातो. म्हणून नेहमी आपल्या मनाला सावधान करीत राहिले पाहिजे की, हे मना तू मायाजाळामध्ये गुंतू नको समजा तू मायाजाळामध्ये गुंतला तर तुला काळ अवश्य खाईल.

आपणास हे देखील माहीत असेल की, जाळयामध्ये तेच पशू-पक्षी गुंततात की, ज्यांना जाळयाबद्दल माहिती नसते. ज्या पशू-पक्षांना जाळयाबद्दल माहिती होते की, या ठिकाणी जाळे पसरलेले आहे तर ते त्या जाळयात गुंतत नाही. तसे मायाजाळापासून वाचायचे असेल तर मायाजाळाबद्दल माहिती मिळाली पाहिजे की, मायाजाळ काय आहे? पशू-पक्षी ज्या जाळयामध्ये गुंततात ते जाळे सामान्य डोळयांनी दिसते की येथे जाळे पसरलेले आहे आणि त्यामध्ये गुंतल्यानंतर लगेच कळत की, जाळयामध्ये आम्ही गुंतलो आहोत परंतु मायाजाळ मोठं विचित्र आहे. ते सामान्य डोळयांनी दिसत नाही आणि गुंतल्यानंतर ही स्वतःला बऱ्याच वेळेस तर कळतही नाही की मी मोहमाया जाळयामध्ये गुंतलो आहे. हे सर्व जाणल्यानंतर मनामध्ये जिज्ञासा होऊ शकते की, शेवटी हे मायाजाळ काय आहे? मायाजाळामध्ये जे गुंतले त्यांचे लक्षण काय आहे? आणि मायाजाळापासून वाचण्याचा, सुटण्याचा उपाय काय आहे? मायाजाळामध्ये जे गुंतले त्यांना मायाजाळापासून कोण सोडविल? इत्यादी अनेक प्रश्न मनात निर्माण होतात.

**माया म्हणजे काय?**

तर सर्वांत पहिले आपण हे जाणण्याचा प्रयत्न करू की, मायाजाळ काय आहे? म्हणजे मायाजाळ किंवा माया कशाला म्हणतात? असा प्रश्न केवळ आपल्याच मनात निर्माण झाला असे नाही. तर आपल्याही पहिले असेच प्रश्न अनेकांच्या मनात निर्माण होत आलेले आहे. जसे लक्ष्मण

भगवान रामाला विचारतात की, हे प्रभू माया काय आहे? तर भगवान श्रीराम म्हणतात....

**थोरेही महँ सब कहहू बुझाई । सुनहू तात मती मन लाई ।**
**मैं अरू मोर तोर तै माया । जेही बस कीन्हे जीव निकाया ।।**

लक्ष्मणाला निमित्त करून भगवान राम म्हणतात की, मी थोडक्यात सांगतो तू मन लावून बुद्धीपूर्वक ऐक. मी आणि माझे तू आणि तुझे हीच माया आहे. की जिच्या अधिन सर्व झालेले आहे.

**मायेचे भेद किंवा प्रकार**

माया समजण्यासाठी मायेची व्यापकता आणि भेद इत्यादीच्या संदर्भात म्हणतात...

**गो गोचर जहाँ लागी मन जाई । सो सब माया जानेउ भाई ।**
**तेही कर भेद सुनहू तुम्ह सोऊ । विद्या अपर अविद्या दोऊँ ।।**
**एक दृष्ट अतिशय दुःखरूपा । जा बस जीव परा भव कृपा ।**
**एक रचई जग गुण बस जाके । प्रभू प्रेरित नही निजबल ताके ।।**

जिथपर्यंत इंद्रियांचा व्यवहार होतो आणि जिथपर्यंत मन जाते ती सर्व माया आहे. या मायेचे दोन भेद आहे. म्हणजेच दोन प्रकारची माया आहे. एक अतिशय दृष्ट माया आहे की, जिच्यामुळे जीव भवसागर, भव कुपात किंवा भवनदीत पडलेला आहे. दुःख भोगतो आहे आणि अजून एक माया आहे की जी भगवंताच्या प्रेरणेने भगवंताच्या शक्तीने त्रिगुणाच्या साह्याने जगाची रचना करते.

तात्पर्य की मायामुळेच जीव दुःख भोगतो. भवसागरात आवागमन



म्हणजेच जन्म-मृत्यू हे सर्व मायेमुळेच होतं. आणि मायेमुळेच हा संसार देखील चालू आहे. हे सर्व मानल्यानंतर मनामध्ये प्रश्न निर्माण होऊ शकतो की, शेवटी माया कोठून निर्माण झाली? आणि माया आहे तर भगवंता समान ती सत्य आहे? की मिथ्या आहे? याचा बोध झालाच पाहिजे.

**मायेची उत्पत्ती**

अशाच एका प्रश्नाच्या संदर्भात संत बहेणाबाई एका अभंगात म्हणतात.

**माया कोठूनिया झालीसे निर्माण । इथे अधिष्ठान ओळखावे ।।**
**कोठोनिया झाली कैसी विस्तारली । माया विवंचली पाहीजेती ।।**
**बहिणी म्हणे माया सत्य की असत्य । विचारूनी तथ्य स्विकारिजे ।।**

माया कोठून निर्माण झाली? मायेचे अधिष्ठान काय आहे? मायेचा विस्तार कसा झाला? मायेच्या बाबतीत विचार केला पाहिजे की, माया सत्य आहे की असत्य आहे. मायेच्या सत्या असत्याच्या संदर्भात विचार करून खरे काय आहे. माया सत्य आहे? की असत्य आहे? हे चांगल्या प्रकारे विचार करून जे सत्य असेल तेच स्विकार केले पाहिजे.

या प्रश्नाबद्दल विचार-मंथन केल्यानंतर, शास्त्र प्रचिती, गुरू प्रचिती आणि आत्म प्रचितीने मायेच्या संदर्भातील या प्रश्नांचे उत्तर देखील संत बहेणाबाईने आपल्या अभंगात दिलेले आहे.

**स्फुर्तीरूप तेथे मायेचा उद्भव । प्रपंचासी ठाव मुळ तेथे ।।**
**ब्रह्म एकले ते गमेना म्हणुनी । स्फुर्ती ते चिंतनी स्वयंवेद्य ।।**
**उदकी शेवाळ होऊनी निर्माण । तेणेची ते जाण अच्छादिले ।।**
**तैसी झाली जा ब्रह्माचीच माया । लपोनिया तया प्रगटली ।।**

या अभंगाचा थोडक्यात भावार्थ असा आहे की, ब्रह्माला स्फूर्ती निर्माण होताच ब्रह्मापासून माया निर्माण झाली. त्या मायेने ब्रह्माला झाकून टाकले. त्यामुळे ब्रह्म अदृश्य झाले व माया दिसू लागली. हे चांगल्या प्रकारे समझावे यासाठी उदाहरण दिले की पाण्यापासून शेवाळ निर्माण होते आणि तेच शेवाळ त्या पाण्याला झाकून टाकते की ज्या पाण्यापासून ते निर्माण झालेले आहे. शेवाळ दिसते परंतु शेवाळामुळे पाणी दिसत नाही. त्याचप्रमाणे माया दिसते. परंतु मायेने ब्रह्माला झाकलेले असल्यामुळे ब्रह्म मात्र दिसत नाही.

**माया सत्य की असत्य ?**

या उदाहरणाने अजून एक प्रश्न मनात निर्माण होतो की, माया ब्रह्मापेक्षाही बलवान आहे का? आणि माया सत्य आहे का? की असत्य आहे? शेवटी मायेचे स्वरूप काय आहे? असे अनेक प्रश्न मायेच्या संदर्भात मनामध्ये निर्माण होतात. जसे संत बहेणाबाई या प्रश्नाच्या संदर्भात विचार मंथन करून म्हणतात...

**सत्य म्हणो जरी मायेसी तत्त्वता । तरी निश्चितार्या असत्यची ।**
**असत्य म्हणता प्रत्यक्ष दिसत । कोण ईचा अंत घेऊ शके ।**
**बहेणी म्हणे माया सत्य ना असत्य । दोन्हीसी अतित केवी घडे ।।**

या अभंगाच्या चरणांचा थोडक्यात भावार्थ हाच आहे की, मायेला सत्य म्हणावं तर ते शक्य नाही कारण माया असत्य आहे. मग मायेला असत्य म्हणाव तर ती प्रत्यक्ष दिसते. माया सत्य ही नाही आणि असत्यही नाही. असे म्हणणे देखील ठीक वाटत नाही. कारण सत्य असत्याची वेगळी माया आहे असे तरी कसे म्हणावे?



हा विचार चांगल्या प्रकारे समजावण्यासाठी एक सुंदर उदाहरण दिलेले आहे.

**सत् म्हणो तरी नासे । असत् म्हणो तरी आभासे ।**
**आधी असे पाठी नसे । ऐसेही नसे निजांगे ।।**

थोडक्यात या पंक्तीचा भावार्थ हा आहे की, मायेला सत्य म्हणाव तर तिचा नाश होतो. खरं म्हणजे मायेची काही सत्ताच नाही, कारण माया सत्य नाही. आता असत्य म्हणाव तर मायेचा आभास होत राहतो. म्हणजे माया दिसते. पहिली होती आता मात्र नाही, असे म्हणणे ही संयुक्तिक नाही. हे चांगल्याप्रकारे समजावे यासाठी एक चांगले उदाहरण दिलेले आहे.

**जैसे मृगजळाचे ज्ञान । दिसे परि ते मिथ्या पूर्ण ।**
**तैसे आभासे भवभान । ते माया जाण नृपनाया ।।**

उदाहरणाचा भावार्थ हाच आहे की, मृगजळ जे दुपारी दिसते, दिसल्यानंतर देखील ते नाही कारण की मृगजळ मिथ्या आहे. हे सर्व जाणतात. जसे मृगजळ सकाळी किंवा संध्याकाळी राहत नाही. तसाच हा संसार पहिले नव्हता व नंतर देखील राहणार नाही. मृगजळाप्रमाणे तो आता दिसतो आणि मृगासमान सर्व त्याच्या मागे धावत आहे. मृगजळा मागे पळणाऱ्या मृगासमान म्हणजेच हरणासमान सर्वांची एक दिवस गती होते. जसे मृग मृगजळ पिऊन तृप्त होत नाही. तसेच संसारापासूनही कोणाचीही तृप्ती होत नाही.

माया आणि मायेची सत्ता समजण्यासाठी अजून एक उदाहरण पाहिले पाहिजे.

**गगनी गंधर्व नगरे । दिसताती नाना प्रकारे ।**
**नाना रूपे नाना विकारे । तैसी माया ।।**

आकाशामध्ये संध्याकाळी ढगामुळे विविध रूपे दिसतात. परंतु तेथे ना नगर असते ना हत्ती, घोडा इत्यादी असतो, केवळ दिसतो. आकाशामध्ये जे दिसते काही क्षणानंतर तेथे काहीच नसते. तिच अवस्था या संसाराची देखील आहे.

तात्पर्य हेच आहे की, ''माया नावाची काही वस्तूच नाही, अज्ञानाने जी सत्ता भासते त्या मिथ्या सत्तेलाच माया म्हणतात.''

सारांश मायेच्या संदर्भात जर हाच निर्णय निघत असेल की माया काहीच नाही तर एक प्रश्न निर्माण होतो की, मग मायेच्या संदर्भात विचार का करायचा? आणि मुळ अभंगाच्या प्रथम चरणामध्ये जे सांगितलेले आहे की, ''नको नको मना गुंतू मायाजाळी '' हे तर मग निरर्थकच होते. परंतु वस्तूतः असे नाही. माया काहीच नाही तरी परंतु मायेमुळे भय, दुःख होतच राहते. म्हणून मायेचे ज्ञान झाले पाहिजे की माया काय आहे? जसे उदाहरण दिले....

**मार्गीमुळी सर्पाकार । देखता भय आले थोर ।**
**कळता तेथीचा विचार । मग मारणे काय ।।**
**तैसी माया भयानक । विचार करता माईक ।**
**मग तियेचा धाक । कासया धरावा ।।**

उदाहरणाचा सारांश हाच आहे की, रस्त्याने जाते वेळेस संधी



प्रकाशात म्हणजे जास्त अंधार ही नाही, आणि जास्त प्रकाश ही नाही. अशा वेळेस मार्गामध्ये पडलेली वृक्षाची मुळी किंवा दोरी सापासमान भासताच तन-मनामध्ये भयकंप तयार होतो. तिचे ज्ञान झाल्याशिवाय भय निवृत्त होत नाही. त्याचप्रमाणे मायेचे ज्ञान झाल्याशिवाय संसारामध्ये सुख, समाधान, शांतता आणि संसार बंधनापासून मुक्ती शक्य नाही.

जसे दोरीच्या ज्ञानाच्या अभावामुळे दोरीला साप समजून व्यक्ती भयभीत राहतो, दुःखी राहतो. त्याचप्रमाणे मायेमुळे जीव देखील भ्रमीत राहतो, दुःखी राहतो. मिथ्याच्या, अशाश्वताच्या मागे रात्रंदिवस धावत राहतो आणि परिणामी दुःखी, अशांतच राहतो. कारण जो मायेच्या भ्रमाने भ्रमीत राहतो तो सत्याला मिथ्या आणि मिथ्याला सत्य समजण्याची चुकी वारंवार करतो. आणि म्हणून तो जन्म-मृत्यूच्या चक्रामध्ये नेहमी फिरत राहतो. जो मायेमध्ये गुंतलेला आहे. जो मायेने भ्रमीत झालेला आहे त्याला समजावणे सोपे काम नाही. जरी एखादा ज्ञानी त्याला समजावण्याचा प्रयत्न करतो तरी तो समजण्याचा प्रयत्न तर करीत नाही, उलट ज्ञानीजनांना तो म्हणतो....

**माया का भ्रमाया कहे अधर्म को धर्म ।**
**ज्ञानी जन को यह कहे आप न समझे मर्म ।।**

**मायेचा प्रभाव**

मायेमुळे भ्रमीत व्यक्ती धर्माला अधर्म आणि अधर्माला धर्म समजण्याची चूक वारंवार करत राहतो आणि जर कोणी ज्ञानी व्यक्तीने त्याला समजावण्याचा प्रयत्न केलाच तर मायेमध्ये गुंतलेला व्यक्ती आपण तर समजून घेत नाही आणि उलट उत्तर देतो की, आपणाला काही समजत नाही माझेच बरोबर आहे.

इतकेच नव्हे तर माया जीवाला सुमार्गापासून परावृत्त करून कुमार्गाला लावते.

**माया ने इस जीव से दिया सुपंथ छुडाय ।**
**अनेक भोग सन्मुख धरे इनमे लिया फसाय ।।**

माया जीवाला सुमार्गापासून परावृत्त करून कुमार्गाला लावते. अनेक प्रकारचे भोग समोर दाखवून त्या भोग-लालसेमध्ये जीवाला माया फसविते. म्हणून जीव भोगलालसेमध्ये फसून आपले जीवन बरबाद करतो. इतकेच नव्हे तर...

**यह माया विष बेल है । अनेक रंग फल देय ।**
**ज्यो भूले सेवण करे । उसके प्राण हर लेय ।।**

ही माया अशी विषाची वेल आहे की, जिला अनेक प्रकारचे विषयरूपी फळे लागतात. जे ते विषयरूपी फळे सेवण करतात ते वारंवार मरत राहतात. म्हणजेच वारंवार जन्ममृत्यूच्या चक्रामध्ये फिरत राहतात. विषापेक्षाही महाभयंकर विषय असतात. विष सेवन केल्याने एकदाच मृत्यू होतो. परंतु विषयाचे सेवन केल्याने वारंवार मृत्यू होत राहतो. तात्पर्य माया विषयरूपी फळे देऊन वारंवार जीवाचा प्राण हरण करत राहते आणि विषयासक्तीमुळे वारंवार जन्म होतच राहतो. म्हणजेच जन्ममृत्यू मायामुळे होतच राहतात.

**मायेचे कुटुंब**

मायेने जन्म मृत्यू कसा होत राहतो? माया हे सर्व एकटीच करते किंवा मायेचे मोठे कुटुंब आहे? जे सर्व मिळून जीवाला अधोगतीमध्ये



आणि वारंवार जन्ममृत्यूच्या चक्रामध्ये गुंतविते? या प्रश्नाच्या समाधानासाठी संत तुकाराम महाराज म्हणतात...

**सकळ हे माया नागवे कवना । भांबविले जना दाही दिशा ।।**
**आशा तृष्णा दंभ लागली ही पाठी । नेदो बैसो हाठी मोहठायी ।।**
**काम क्रोध घरा लावतील आगी । निंदा हिंसा दोघी पळता खाती ।।**
**लाज पुढे उभी राहिली आडवी । ते करी गाढवी थोर घात ।।**
**तुका म्हणे चिंता घाली गर्भवासी । ओढोनिया फासी चहूकडे ।।**

मायेच खूप मोठं कुटुंब आहे. त्या मायेच्या कुटुंबामुळे सर्व दुःखी आहे. त्यामुळे जीव इकडे तिकडे पळत राहतो. आशा, तृष्णा आणि दंभ जीवाच्या पाठीमागे लागलेले आहे. म्हणून जीव या संसाररूपी बाजारामध्ये एक क्षणभर देखील स्थिर बसत नाही. जीवाच्या पाठीमागे आशा लागलेली आहे. रात्रंदिवस नाना प्रकारच्या आशा अपेक्षामुळे जीव पळत राहतो आणि समजा कुणाची काही आशा अपेक्षा पूर्ण झालीच तर तृष्णा त्याच्या पाठीमागे लागते. म्हणून काही अपेक्षा पूर्ण झाल्या तरी तृष्णा शांत न होता वाढतच राहते. आशा पूर्ण होत नाही आणि तृष्णा शांत होत नाही आणि काही प्रमाणात झालीच तर दंभ, अहंकार, अभिमान येतो. त्या दंभामुळे, अहंकारामुळे व अभिमानामुळे जीव दुःखी राहतो आणि इतरांनाही दुःखी करतो.

मायेची अजून संतान काम आणि क्रोध ज्यामुळे जीव रात्रंदिवस जळत राहतो. मनामध्ये, तनामध्ये जो काम, क्रोध निर्माण होतो, त्यामुळे तन मन जळत राहते.

मायेची दुसरी संतान निंदा आणि हिंसा ही तर पळत्या जीवाच्या देखील पाठीमागे लागलेली आहे. चालणाऱ्या फिरणाऱ्या जीवाकडून निंदा

आणि हिंसा होत राहते.

मायेपासून वाचण्यासाठी साधू-संताच्या, महापुरूषांच्या, सद्‌गुरूच्या सानिध्यात जायला पाहिजे. भगवंताची भक्ती करायला पाहिजे. परंतु मायेची अजून एक संतान जी लज्जा आहे. जी वरील महापुरुषांच्या सानिध्यात जाउच देत नाही. म्हणून त्या महापुरुषांच्या लाभापासून जीव वंचित राहतो. लज्जा त्या महापुरुषांच्या सानिध्यात जीवाला जाऊ देत नाही.

मायेची अजून एक संतान चिंता आहे. त्या चिंतेमुळेच जीव भगवंताचे चिंतन करत नाही. चिंता ही जीवाला चौऱ्यांशीच्या फेऱ्यामध्ये भ्रमण करायला लावते.

हे सर्व मायेचे कुटुंब मिळून जीवाला मायाजाळामध्ये फसवत राहतात. म्हणून तुकाराम महाराज आपल्या मनाला सावधान करतात की....

**नको नको मना गुंतू माया जाळी ।**

एक वेळेस नाहीतर दोन वेळेस आणि नेहमी-नेहमी म्हणतात की, हे मनोबा मायाजाळामध्ये गुंतू नको.

**मायाजाळामध्ये गुंतलेल्याचे लक्षण काय ?**

मायेच्या संदर्भात हे सर्व जाणल्यानंतर अजून एक प्रश्न मनाध्ये निर्माण होऊ शकतो, तो हा की शेवटी आम्ही कसे जाणावे की आम्ही मायाजाळामध्ये गुंतलेलो आहे किंवा नाही? मायाजाळामध्ये जे गुंतलेले आहे त्यांचे लक्षण काय आहे? या प्रश्नाच्या उत्तराच्या संदर्भात संत चोखाजी महाराजांनी मायेमध्ये गुंतलेल्या जीवाच्या मनोदशाचे वर्णन एका अभंगामध्ये केलेले आहे.



**माया मोह जाळे गुंतलोसे बळे । यातूनी वेगळे करी गा देवा ।।**
**न कळेची स्वार्थ अथवा परमार्थ । बुडालोसे निभ्रांत याच माझी ।।**
**न घडे देवार्चन संताचे पूजन । मन समाधान कधी नव्हे ।।**
**नसतेची छंद लागती अंगासी । तेणे कासाविस जीव होय ।।**
**चोखा म्हणे याही चोरे नागविलो । माझा मीची झालो शत्रू देवा ।।**

मायाजाळामध्ये गुंतलेल्या जीवाच्या मनोदशेचे वर्णन या अभंगामध्ये केलेले आहे. जो जीव मायाजाळामध्ये गुंतलेला आहे आणि ज्या जीवाला जाणीव झालेली आहे की, मी मायाजाळामध्ये गुंतलेलो आहे. त्या जीवाने भगवंताकडे प्रार्थना केलेली आहे की, हे भगवंता मी मायाजाळामध्ये गुंतलेलो आहे. मला या मायाजाळापासून सोडवा.

**माया मोह जाळे गुंतलोसी बळे । यातूनी वेगळे करीगा देवा ।।**

या ठिकाणी मनामध्ये हा प्रश्न निर्माण होऊ शकतो की, त्या जीवाला कसे कळाले की, मी मायाजाळामध्ये गुंतलेलो आहे. तर मायाजाळामध्ये गुंतलेला जीव भगवंताला म्हणतो की, मी मायाजाळामध्ये गुंतलो आहे. म्हणजेच अज्ञानरूपी मायाजाळामध्ये गुंतलो आहे. कारण मायेचा एक अर्थ हा ही होतो की, माया म्हणजे अज्ञान, तर मायाजाळामध्ये गुंतलेला जीव भगवंताला म्हणतो की, मी मायाजाळामध्ये गुंतल्याकारणाने

**न कळेची स्वार्थ अथवा परमार्थ । बुडालोसी निभ्रांत याच माझी ।।**

मला परमार्थ तर काय स्वार्थदेखील समजेनासा झाला आहे.

मी मायाजाळामध्ये म्हणजेच अज्ञानामध्ये पूर्णपणे बुडालो आहे.

मायाजाळामध्ये गुंतल्याने माझ्याकडून भगवंताची भक्ती होत नाही. तसेच संताचे पूजनही होत नाही. देवार्चन आणि संतांचे पूजन न झाल्यामुळे मनाला कधी समाधान लाभत नाही.

**न घडे देवार्चन संतांचे पूजन । मन समाधान कधी नव्हे ।।**

जीवनामध्ये सुख, समाधान, शांतता प्राप्त करायची असेल तर त्यासाठी महापुरूषांनी एक सिद्धांत सांगितलेला आहे.

**स्वर्ग मृत्यू पाताल मे पूर तीन सुख नाही ।**
**सुख ईश्वर के भजन में और संतन्ह के माही ।।**

या त्रैलोक्यामध्ये सुख केवळ भगवंताच्या भक्तीमध्ये आणि संताच्या सानिध्यात आहे. म्हणून जो भगवंताची भक्ती करतो आणि भगवंताची भक्ती कशी करावी हे संतांच्या सानिध्यात जाउन त्यांची कृपा संपादन करून त्यांच्यापासून भक्तीचे ज्ञान प्राप्त करतो. त्यांच्या जीवनामध्ये सुख, समाधान, शांतता प्राप्त होते. परंतु जो भक्ती करत नाही, संतांच्या सानिध्यात जात नाही त्यांना जीवनात कधी सुख, समाधान प्राप्त होत नाही.

जीवनामध्ये सुख, समाधान, शांतता प्राप्त व्हावी असे तर सर्वच इच्छा करतात. म्हणून मायामध्ये गुंतलेला जीव देखील हीच इच्छा करतो की, मला जीवनामध्ये सुख, समाधान, शांतता मिळाली पाहिजे. सुख, समाधान, शांतता जी भगवंताच्या भक्तीने आणि संतांच्या संगतीने प्राप्त होते परंतु मायामध्ये गुंतलेला जीव भक्ती करीत नाही व संतांची संगतीही करत नाही. म्हणून त्याला कधीच सुख, समाधान मिळत नाही.



मायाजाळामध्ये गुंतलेला जीव सुख, समाधान, शांतता मिळविण्यासाठी

**नसतेची छंद लागती अंगासी । तेणे कासाविस जीव होय ।।**

जे खाऊ नये ते खाण्याचा छंद, जे पिऊ नये ते पिण्याचा छंद, जे करू नये ते करण्याचा छंद करतो म्हणून नेहमी अशांत, दुःखी, असमाधानी राहतो. मायाजाळामध्ये गुंतलेल्या जीवाची विशेषतः ही आहे की, सर्व सवयींचा, व्यसनांचा, दुष्पपरिणाम तो जाणत नाही. आणि काही जाणतात, थोडा दुष्परिणाम त्यांच्या लक्षात ही येतो. तरी परंतु जसे....

**चोखा म्हणे याही चोरे नागविले । माझा मिची झालो शत्रु देवा ।।**

या व्यसनामुळे वाईट आचार-विचारामुळे माझी ही दुर्दशा झालेली आहे. मीच माझा शत्रू झालो. असे त्याला कधी कधी कळायला देखील लागते. तरी परंतु तो त्यापासून सुटने अशक्य मानतो. आणि म्हणून दुःख ही दुःख भोगत राहतो. आणि त्या दुःखामुळे नेहमी अशांत कासावीस राहतो. हे सर्व मायाजाळामध्ये गुंतलेल्या जीवाचे लक्षण आहे. मायाजाळामध्ये गुंतलेल्या जीवाला काळ खातो. त्याची अधोगती होते जीवंतपणी दुःख आणि मृत्यूनंतर नरक प्राप्त होतो. म्हणून नेहमी आपल्या मनाला समजाविले पाहिजे की,

**नको नको मना गुंतू माया जाळी । काळ आला जवळी ग्रासावया ।।**

मायाजाळामध्ये गुंतू नये आणि जर गुंतले असाल तर काळ अवश्य आपल्याला धरील.

**माया जाळामध्ये गुंतलेल्या जीवाला कोण सोडविल?**

काळाने धरल्यानंतर त्या काळापासून आपल्याला भगवंताशिवाय कोणीच सोडविणार नाही. जसे संत तुकाराम महाराज म्हणतात.

**काळाची हे उडी पडेल बा जेव्हा । सोडविना तेव्हा मायबाप ।।**
**सोडविना बंधू पाठीची बहिण । शेजेची कामीन दूर राहे ।।**
**सोडविना राजा देशाचा चौधरी । आणिक सोयरी भलीभली ।।**
**तुका म्हणे तुज सोडविना कोन्ही । एका चक्रपाणी वाचोनिया ।।**

भावार्थ खूपच सोपा आहे. काळाची उडी पडल्यानंतर, काळापासून आपणास आई-वडिल, भाऊ-बहीण, पती-पत्नी, मोठमोठे सोयरे तर काय देशाचा राजा देखील सोडवू शकणार नाही. एका भगवंताशिवाय दुसरे कोणीच सोडवू शकत नाही. हे समजवण्यासाठी संत तुकाराम महाराजांनी गजेंद्र मोक्षाची कथा सांगितलेली आहे. जी पुराणात देखील वर्णन केलेली आहे. पुराणामध्ये गजेंद्र मोक्षाची कथा खूप विस्ताराने सांगितलेली आहे. थोडक्यात ती कथा अशा प्रकारे आहे.

**मायाजाळापासून, काळापासून सुटण्याचा उपाय-ईश्वर कृपा गजेंद्र मोक्ष कथा -**

द्रविड देशाचा पांड्य राजा तप करण्यासाठी जंगलात गेला. जंगलात जाऊन तो तप करायला लागला. जप, तप, अनुष्ठान कसे करायला पाहिजे हे संत किंवा सद्‌गुरूमुखाने जाणून घेतले पाहिजे परंतु त्या राजाने हे जाणले नव्हते. एक दिवस अगस्ती ऋषी तेथे आले. संतांची संगती नसल्यामुळे राजा मर्यादा जाणत नव्हता. संत, सद्‌गुरू, आपल्यापेक्षा जे मोठे आहे, ज्ञानी आहे ते येताच उठून त्यांचा सन्मान केला पाहिजे. जेणे आपल्या सुसूप्त शक्तीचा विकास होतो आणि धर्ममर्यादांचे पालन



होते. हे सर्व तो राजा जाणत नव्हता. मोठ्यांच्या मर्यादांचे पालन न केल्यामुळे अगस्ती ऋषी नाराज झाले. धर्ममर्यादेचे रक्षण करण्यासाठी, शिक्षा देण्यासाठी त्यांनी हत्ती होण्याचा शाप पांड्य राजाला दिला. शापामुळे पुढच्या जन्मात राजा हत्ती झाला.

पुराणामध्ये अजून एक कथा येते. देवल ऋषी पाण्यामध्ये उभे राहून, डोळे बंद करून भगवंताला अर्घ्य देत होते. त्याच वेळेस हू हू नावाच्या गंधर्वाने पाण्यामध्ये डुबकी मारून मगरासारखे त्यांचे पाय धरले. पाय धरल्यामुळे ध्यानामध्ये मग्न देवल ऋषींचे ध्यान विचलीत झाले. ते घाबरले की मगराने तर पाय धरला नाही. डोळे उघडून बघितले तर हू हू नावाच्या गंधर्वाने मगरासारखे पाण्यामध्ये डुबकी मारून त्यांचे पाय धरले होते. म्हणून त्या गंधर्वाला मगर होण्याचा शाप ऋषीने दिला. तो पुढच्या जन्मात मगर झाला.

ज्या तळयामध्ये तो शापीत मगर राहत होता, त्याच तळयात शापीत हत्ती म्हणजे गजेंद्र आपल्या सर्व हत्तीसह पाणी पिण्यासाठी गेला. पाणी पिल्यानंतर सर्व हत्ती जलक्रीडा करायला लागले. त्याचवेळेस त्या गजेंद्राचा पाय मगराने धरला. मगराने पाय धरताच सर्व हत्ती धाऊन त्या ठिकाणी आले आणि आपल्या सोंडेने हत्तीला वाचविण्यासाठी पाण्यातून बाहेर ओढायला लागले. कधी ते हत्तीला बाहेर ओढत आणायचे तर कधी तो मगर त्या हत्तीला पाण्यात ओढत न्यायचा. याचे वर्णन करतांना संत तुकाराम महाराज आपल्या एका दुसऱ्या अभंगात म्हणतात.

**गजेंद्र तो हत्ती सहस्त्र वर्ष । जळामाजी नक्रे पिडीलासे ।।**

पाण्यामध्ये अशा प्रकारे मगरामुळे गजेंद्र अत्यंत दुःखी झाला. तो रक्तश्राव आणि भुकेमुळे शक्तीहीन झाला. ज्यावेळेस सर्व हत्तींच्या लक्षात आले की, आपला राजा गजेंद्र शक्तीहीन झालेला आहे असे वाटते की,

हा आता वाचणार नाही आणि वाचलाच तर हा आपल्या संरक्षणाच्या योग्य राहणार नाही. आता तर असेच वाटते की हा आता निश्चित मरणार तर आम्ही का याच्यासोबत मरायचं. असा विचार करून त्या सर्वांनी त्याला तेथे एकट्याला सोडून दिले आणि सर्वांनी आपल्या सुखासाठी अरण्याचा रस्ता धरला. ते सर्व जंगलात निघून गेले.

जेव्हा गजेंद्राने हे बघितले की, आपले सर्व सगेसंबंधी आपणाला सोडून आपल्या सुखासाठी जंगलात चालल्या गेले. तेव्हा पूर्व जन्माच्या काही पुंण्यामुळे गजेंद्राच्या मनात विचार आला, जसे संत तुकाराम महाराजांनी आपल्या मुळ अभंगात सांगितलेले आहे की, जेव्हा काळ येतो तेव्हा काळापासून आई-वडिल, भाऊ-बहीण, पती-पत्नी, किंवा मोठमोठे सोयरे तर काय राजा देखील सोडवू शकत नाही. काळाच्या तावडीतून सोडवितो केवळ भगवंत म्हणून...

**सुहृदयी सांडिले कोन्ही नाही साह्ये । अंती वाट पाहे विठु तुझी ।।**

मृत्यूपासून सोडविण्यासाठी कोणीच साह्याला राहिले नाही, सर्व सोडून चालल्या गेले. जो विश्वास होता की, मला माझे सगेसंबंधी वाचवतील तो विश्वास समाप्त झाला. आता एकच भाव मनामध्ये जागृत झाला की, मला आता भगवंताशिवाय कोणीच सोडवू शकणार नाही. म्हणून गजेंद्राने पूर्ण श्रद्धेने भगवंताला आवाज दिला. हे भगवंता धाव मला वाचव !

असा शब्द ऐकताच भगवंत विमान घेऊन गजेंद्राला वाचविण्यासाठी, तारण्यासाठी आले. संत तुकाराम महाराज त्याचे वर्णन करतात.

**कृपेच्या सागरा माझ्या नारायणा । तया दोघाजना तारियेले ।।**

अभंगाच्या या चरणाचे चिंतन करण्यापूर्वी या अभंगाच्या पूर्वीच्या



चरणाचे जरूर चिंतन किंवा विचार केला पाहिजे. पहिल्या चरणामध्ये म्हणतात-

**सुहृदयी सांडिले कोन्ही नाही साह्ये ।**

सर्वांनी गजेंद्राला एकट्याला सोडून दिले होते. एक देखील मदतीला तेथे नव्हता. या चरणामध्ये म्हणतात की, विमान घेऊन आले आणि भगवंताने कृपा केली आणि दोघांनाही तारले. विमानामध्ये बसविले. तर मनामध्ये प्रश्न निर्माण होतो की, गजेंद्राला जर सर्व सोडून गेले होते, कोणीच संगतीला राहिले नव्हते तर भगवंताने दोघांना तारले याचा अर्थ काय? तर कथेमध्ये वर्णन येते की, भगवंत धावा ऐकून तारण्यासाठी आले तर त्यांनी सर्वांत पहिले मगराला तारण्यासाठी, भवसागरातून पार करण्यासाठी विमानात बसविले. हे बघून गजेंद्र तर पाहतच राहिला. शेवटी गजेंद्राने भगवंताला विचारले की हे भगवंता तारण्यासाठी तर मी धावा केला होता, बोलाविले होते. आपण तर पहिले मगराला विमानात बसविले. ज्याने माझा पाय धरला होता. ही काय लिला आहे? तर भगवंत म्हणाले की हे गजेंद्रा ! माझा असा नियम आहे की, मी माझ्या त्या भक्तांचा उद्धार करतो, जो माझ्यावर अनन्य भावनेने श्रद्धा ठेवतो आणि अनन्य भावनेने मला हाक मारतो, तो माझा भक्त होतो. आणि ज्या क्षणी तो भक्त होतो त्याच क्षणी त्याचा उद्धार होतो आणि माझा अजून एक नियम आहे की, माझ्या भक्ताचा जो चरणस्पर्श करतो त्याचा मी भक्तांचा पहिले उद्धार करतो की, ज्याने माझ्या भक्ताचा चरण स्पर्श केलेला आहे. म्हणून गजेंद्रा ज्या क्षणी तू मला अनन्य श्रद्धेने, भावनेने हाक मारली त्याच क्षणी तू माझा भक्त झाला. ज्या क्षणी तू माझा भक्त झाला त्याच क्षणी तुझा उद्धारही झाला. तू माझा भक्त बनल्यामुळे तुझ्या चरणाचा

स्पर्श ज्या मगराला झाला त्या मगराचा उद्धार करणे माझे कर्तव्य आहे. म्हणून भक्ताच्या  पहिले भक्ताच्या चरणाचा स्पर्श म्हणजेच तुझा चरण स्पर्श ज्या मगराला झाला. त्या मगराचा उद्धार करण्यासाठी मी पहिले मगराला विमानात बसविले. कारण भक्ताच्या  पहिले मी भक्ताच्या भक्ताच्या  उद्धार करतो. विचार करण्यासारखा हा प्रसंग आहे की, खूप श्रद्धा भक्ताने  मगराने गजेंद्राचा पाय धरला होता. दर्शनासाठी स्पर्श केला होता असे नाही. तरी देखील ज्या गजेंद्र भक्ताचा चरणस्पर्श ज्या मगराला झाला त्या मगराचा देखील उद्धार झाला. जर आपण पूर्ण श्रद्धेने, भावनेने, संत, सद्‌गुरूच्या चरणाचा स्पर्श केला तर आपला देखील उद्धार का होणार नाही?

या अभंगाचा अजून एक अंतिम चरण विचार करण्यासारखा आहे. ज्याच्यामध्ये संत तुकाराम महाराज म्हणतात -

**तुका म्हणे नेले वाहोनी विमानी । मीही आयकोनी विश्वासलो ।।**

**गजेंद्र मोक्ष कथा-श्रवण फळ-तुकाराम महाराजांचे वैकुंठ गमन -**

भगवंताने विमानामध्ये बसवून मगराचा आणि गजेंद्राचा उद्धार केला. हा प्रसंग तुकाराम महाराजांनी प्रत्यक्ष पाहिला नाही. फक्त आपण जशी ही गजेंद्र मोक्षाची कथा ऐकत आहात त्याच पद्धतीने तुकाराम महाराजांनी संताच्या मुखाने ही कथा ऐकली आणि मनामध्ये विश्वास निर्माण झाला की, भगवंत जर पशूचा उद्धार, ज्याने भक्त गजेंद्र पशूचा पाय क्रुर भावनेने धरला होता, त्या मगराचा उद्धार करू शकतो, तर आपण तर मनुष्य आहोत आम्ही जर श्रद्धा भक्तीने संताचा, सद्‌गुरूचा चरणस्पर्श केला, अनन्य भावनेने भक्ती केली, तर आमचा देखील निश्चित उद्धार होऊन जाईल. असा मनात दृढ विश्वास निर्माण झाला. सर्व भक्त



जाणतात की एक दिवस ...

**आम्ही जातो आमच्या गावा । आमचा रामराम घ्यावा ।।**

आम्ही आमच्या गावाला जात आहोत म्हणजे संताचे, भगवंताचे जे गाव आहे, जेथे गेल्यानंतर जन्ममृत्यूच्या चक्रापासून जीव कायमचा सुटून जातो. अशा आमच्या गावाला जात आहोत. आपण आमचा शेवटचा प्रणाम स्वीकार करा. असे म्हणत संत तुकाराम महाराज भगवंताच्या विमानात बसून वैकुंठाला निघून गेले अशी भक्तांची मान्यता आहे.

गजेंद्राचा उद्धार झाला. संत तुकाराम महाराज आणि इतर अनेक भक्तांचा, संतांचा उद्धार झाला. आता बारी आपली आहे. आपला देखील उद्धार झाला पाहिजे. आपण देखील मायाजाळापासून सुटले पाहिजे. तर प्रश्न निर्माण होतो की, आम्ही मायाजाळापासून कसे सुटू? कसे मुक्त होऊ? मायाजाळाला कसे तोडू? या प्रश्नाच्या उत्तरासाठी संत तुकाराम महाराज म्हणतात.

**आपुलीया अंगे तोडी मायाजाळ । ऐसे नाही बळ कोणापासी ।।**
**रांडा पोरे त्याग करी कुटुंबाचा । नावरे हे वाचा आणि मन ।।**

स्वतः मायाजाळापासून मुक्त होणे अत्यंत कठीण आहे. स्वतः मायाजाळयाला तोडील आणि मायाजाळापासून मुक्त होईल असे सामर्थ्य कोणापासी नाही. कारण मन खूप विचित्र आहे. मायेचा, मिथ्याचा त्याग करणे, अधर्माचा त्याग करणे मनाला कठीण वाटते. म्हणून म्हणतात की,
**''रांडा पोरे त्याग करी कुटुंबाचा । नावरे हे वाचा आणि मन ।।''**

रांडा म्हणजे वेश्येसारखी स्त्री आणि तिच्यापासून जन्मलेले पोरे

म्हणजे मुलांचा, दुःखरूप कुटुंबाचा त्याग होणे कठीण आहे. मन आणि वाचा आपल्या अधिन न झाल्यामुळे या सर्वांचा त्याग होणे कठीण आहे. जसे अजामिळाला वेश्या आणि तिच्यापासून उत्पन्न संतानाचा त्याग करणे कठीण वाटत होते. म्हणून तो त्यांच्यासाठी पापकर्म करत होता आणि मायाजाळामध्ये गुंतलेला होता. त्याला ते सर्व कधी-कधी चांगले वाटत नव्हते तरी त्या मायाजाळाला तोडणे त्याच्यापासून सुटणे त्याला अशक्य वाटत होते.

**माया जाळापासून मुक्ती उपाय - सत्संगती**

स्वतः जर मायाजाळाला कोणी तोडू शकत नाही, मायाजाळापासून सुटू शकत नाही तर मायाजाळापासून बाहेर कसे निघायचे? त्यासाठी उपाय काय आहे? तर ज्ञानी महापुरूष म्हणतात.

**इस माया के भवर से बिरला निकले कोय ।**
**ये करणा कर्तारकी या सतसंगती होय ।।**

या मायारूपी भोवऱ्यातून एखादाच बाहेर निघतो. एखादाच या मायाजाळापासून मुक्त होतो आणि जो निघतो, तो मुक्त होतो. त्याची दोन कारणे असतात. पहिले कारण म्हणजे भगवंताची कृपा आणि दुसरे संतसंगती. म्हणजे संताची, सद्गुरूची संगती. मायाजाळापासून सुटण्यासाठी हे दोन उपाय सांगितलेले आहे. येथे देखील मनामध्ये एक प्रश्न निर्माण होऊ शकतो. तो हा की आम्हाला मायाजाळापासून मुक्त व्हायचे आहे, तर आम्ही काय करायला पाहिजे? भगवंताची कृपा संपादन करायची की संताच्या सद्गुरूच्या सानिध्यात जायचे ? या प्रश्नाच्या उत्तरासाठी एक कथा जी तुलसी रामायणामध्ये आलेली आहे, ती जरूर ऐकायला पाहिजे आणि त्या कथेचे मनन-चिंतन करायला पाहिजे. तुलसी रामायणामध्ये



जी कथा आलेली आहे, ती थोडक्यात या प्रकारे आहे.

**मायेपासून मुक्ती उपाय सत्संगती-गरूडाची कथा**

भगवान राम लंकेमध्ये रन लीला म्हणजे युद्ध करत होते. त्यावेळी भगवान राम आणि लक्ष्मण नागपाशामध्ये बांधल्या गेले. नागपाशातून सोडविण्यासाठी सर्प, नागांचे शत्रू भगवान विष्णूचे वाहन गरूडाला बोलावण्यात आले. गरूड येताच भगवान राम, लक्ष्मण नाग पाशातून मुक्त झाले. परंतु गरूड मायेमध्ये म्हणजेच अज्ञानामध्ये गुंतल्या गेले. त्यांची दशा या प्रकारे झाली.

**बंधन काटी गयो उरगादा । उपजा हृदय प्रचंड विषादा ।**
**प्रभू बंधन समझत बहु भाँती । करत बिचार उरग आराती ।।**
**व्यापक ब्रह्म बिरज बागीसा । माया मोह पार परमीसा ।**
**सो अवतार सुनेहू जगमाही । देखेहू सो प्रभाव कछूनाही ।।**

नागपाश तोडण्यासाठी गेलेले गरूड मनामध्ये भगवंताच्या बंधनाच्या संदर्भात विचार करायला लागले की, जो सर्वव्यापक, सर्व समर्थ मायामोहाच्या पार परमेश्वर आहे. त्या परमेश्वराचा जगामध्ये अवतार झालेला आहे असे मी ऐकले होते. परंतु येथे बघितले तर त्यांच्यामध्ये काहीच प्रभाव नाही. एका सामान्य राक्षसाने त्यांना नागपाशामध्ये बांधले. तर त्यांना भगवंत कसे मानायचे? या प्रश्नाच्या शंका समाधानासाठी ते ब्रह्मादी देवताकडे व शेवटी भगवान शिवाकडे गेले. भगवान शिवाने त्यांना काकभुशुंडीकडे पाठविले आणि जेव्हा काकभुशुंडीच्या सानिध्यात गेले तेथे बरेच दिवस राहिले. सत्संगाचा लाभ घेतला तेव्हा ते अज्ञानरूपी मायेपासून मुक्त झाले आणि म्हणायला लागले.

**गुरूबिन भवनादि तरई न कोई । ज्यो बिरंची शंकर सम होई ।।**

जरी कोणी ब्रह्मदेवासमान सृष्टी रचण्यास सामर्थ्यशाली असेल किंवा कोणी भगवान शंकरासमान ज्ञानी असेल तरी तो मायारूपी म्हणजेच अज्ञानरूपी भवनदिपासून सद्‌गुरूच्या संतांच्या साह्यावाचून पार पोहचू शकत नाही. भगवान विष्णूचे वाहन असतांना आणि त्याच भगवान विष्णूचे अवतार राम असतांना गरूड त्यांना ओळखू शकले नाही. तेव्हा इतरांची काय कथा !

संत तुकाराम महाराजांनी जे सांगितले की, भगवंताशिवाय मायाजाळापासून काळाच्या भयापासून कोणी सोडवू शकत नाही ते सत्यच आहे. परंतु भगवंताची प्राप्ती, त्यांची ओळख होण्यासाठी सत्संगती म्हणजेच संतांची, सद्‌गुरूंची संगत अत्यंत आवश्यक आहे. ज्ञानाशिवाय अज्ञानरूपी मायेचा नाश होत नाही, आणि ज्ञान सद्‌गुरूशिवाय, संताशिवाय मिळू शकत नाही. म्हणून मायेचा नाश करायचा असेल तर त्यासाठी संतसंगती पाहिजे. संत संगतीने ज्ञान आणि ज्ञानाने अज्ञानरूपी मायेचा नाश होतो. म्हणून ज्ञानी म्हणतात...

**माया कुकरी मारिए ज्ञान दण्ड ले हाथ ।**
**कर्म उपासना मित्र दो लेकर अपने साथ ।।**

ज्ञान प्राप्त केले पाहिजे. ज्ञानाने अज्ञानरूपी मायेचा नाश होतो. सोबत सत्कर्म आणि भगवंताची उपासना म्हणजेच भक्तीं केली पाहिजे.

हे सर्व होण्यासाठी संत तुकाराम महाराजाप्रमाणे मायाजाळामध्ये गुंतू नये असे आपल्या मनाला समजावले पाहिजे.

अजून एक संत ब्रह्यानंद महाराज आपल्या मनाला समजावतात.



**ब्रह्मानंद महाराजांचा मनाला उपदेश**

**मन क्यो भूला रहा है । दुनियाकी मौज माही ।**
**करके विचार देखो कछू सार वस्तू नाही ।। धृ ।।**

हे मना ! या संसाराच्या मौजमजेमध्ये गुंतू नको विचार करून पहा. विचार केल्यानंतर हेच लक्षात येते की, या संसारामध्ये कोणतीच वस्तू शाश्वत नाही. सर्व संसार अशाश्वत, नश्वर,मिथ्या आहे.

**जोबन बहार तनकी मेहमान चार दिनकी ।**
**जीम रोशनी स्वपनकी सब बेग बीत जाई ।।१।।**

शरीराचे तारुण्य आणि सुंदरता काही दिवसासाठीच आहे आणि हे ही माहीत नाही की, जीवनामध्ये तारूण्य मिळेल किंवा नाही. कारण बरेच तारूण्य प्राप्तीच्या पूर्वीच मरतात आणि मिळाले तर तारूण्य किंवा जे काय जीवनात मिळाले ते सर्व स्वप्नाप्रमाणे क्षणिक आहे. म्हणून हे मना तू या स्वप्नजालामध्ये मायेमध्ये गुंतू नको.

**धन माल मित प्यारे कोई संग ना सिधारे**
**जब काल आय मारे सबसे करे जुदाई ।।२।।**

धन, दौलत, मित्र, सगे-संबंधी जे आज आपल्या सोबत आहे. मृत्यूच्या एका झटक्याने सर्व आपले परके होतात. आपले कोणीच राहत नाही. म्हणून हे मना, तू यामध्ये आसक्त होऊ नकोस.

हा सर्व संसार मायामय आहे. तर शेवटी काय करायला पाहिजे? शेवटी सत्य काय आहे? तर म्हणतात.

**प्रभू नाम को सुमिरले कुछ काम नेक करले ।**
**ब्रह्मानंद ध्यान धरले ईश्वर सदा सहाई ।।३।।**

भगवंताचे नाम स्मरण केले पाहिजे. काही चांगले कर्म जसे जप, तप, अनुष्ठान, सेवा, दान, पुण्यकर्म, सत्संग-प्रवचन, कथा, कीर्तन, श्रवण केले पाहिजे. हे सर्व केल्याने भगवंत नेहमी त्याला सहाय्य करत राहतो. काळाच्या भयापासून वाचवितो.

**अंतीम उपदेश**

भगवंताशिवाय काळभयापासून वाचविणारा या संसारामध्ये कोणीच नाही. आपण कोठेही जा आणि कितीही उपाय करा....

**काल न छोडे कहीपर भाग चहुदिसी जाय ।**
**चाहे भूमीमे धसे चाहे गगन उडाय ।।**

इंद्रजिताने म्हणजेच मेघनाथने खूप मायावी शक्तीचा आश्रय घेतला. परंतु शेवटी मरावेच लागले, म्हणून भगवंताची भक्ती केली पाहिजे, भगवंताचे नामस्मरण केले पाहिजे आणि नेहमी लक्षात ठेवले पाहिजे.

**आ ब्रह्म स्तंभ पर्यंत सर्व मायामयं जगत् ।**
**सत्यं सत्यं पुन्हा सत्यम् हर्रेनामैव केवलम् ।।**

या संसारामध्ये जे दिसते ते सर्व नासते सर्व मिथ्या आहे, माया आहे. या संसारामध्ये पहिले सत्य होते, आज सत्य आहे व भविष्य काळात देखील सत्य राहींल ते म्हणजे भगवंत, भगवंताची भक्ती, भगवंताचे



नामस्मरण !!

भगवंताकडे प्रार्थना

म्हणून भगवंताची प्रार्थना करायला पाहिजे की, हे भगवंता! हे प्रभू, माझ्यावर कृपा करा की, मी सर्व मिथ्या, मायेची आसक्ती त्यागून आपले रात्रंदिन भजन करेल. कारण की तेच तर सत्य आहे, म्हणून हे प्रभू.

**अब प्रभू कृपा करहू यही भाँती । सब तजी भजन करहू दिन राती ।।**
**जयती शिवा शिव जानकी राम । गौरी शंकर सीता राम ।।**
**जय रघूनंदन जय सीयाराम । ब्रज गोपी प्रिय राधेश्याम ।।**
**रघूपती राघव राजाराम । पतित पावन सीताराम ।।**
**श्रीराम जय राम जय जय राम । जय महारूद्र जय हनुमान ।।**
**विठ्ठल विठ्ठल पंढरीनाथ । जय शिव शंकर भोलेनाथ ।।**
**दुर्गती नाशिनी दुर्गा माँ । काल विनाशिनी काली माँ ।।**
**आदि शक्ती भवानी माँ । भव भय भंगसी भांगसी माँ ।।**

**ॐ नमः पारबती पतये हर हर महादेव**
**गोपाल कृष्ण भगवान की जय**
**श्री गुरूदेव दत्त दत्त दत्त अलख निरंजन**
**सद्‌गुरु जनार्दन स्वामी महाराज की जय**
**महामंडलेश्वर स्वामी परमानंदगिरीजी महाराज की जय**

## स्वामीजींचे जपानुष्ठान काळातील सत्संग - प्रवचन

# पुस्तके, व्ही.सी.डी

| दिवस | सकाळ | रात्री |
|---|---|---|
| १ ला | जन्म - मृत्यू चक्र निवृत्ती | मायाजाळा पासून मुक्ती |
| २ रा | प्रातःकाळी उठावे | संसार सागरातून मुक्ती |
| ३ रा | नाम जपाची विधी | करावे तसे भरावे |
| ४ था | ध्यानाची विधी | नाम जपाने मुक्ती |
| ५ वा | भोजनाने भक्ती | संत संगतीने मुक्ती |
| ६ वा | असाध्य ते साध्य | दानाने सद्गती |
| ७ वा | पाप निवृत्ती उपाय | सद्गुरु वचनामृताने मुक्ती |
| ८ वा समाप्तीचा दिवस | प्रवृत्ती निवृत्ती मार्ग | नित्यकर्म - अनुष्ठान महिमा |